# <u>वार्तापत्र</u>

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. २५/०१/२०१८

## *आरोपी प्रशांत राही व महेश तिर्की दोषीच*

- ***नक्षली कृत्यांमध्ये सहभागी असल्याचे नोंदवत नागपूर खंडपीठाने फेटाळला जामीन.***

सन २०१३ मध्ये गडचिरोली जिल्ह्यातील पोस्टे अहेरी येथे बेकायदेशीर कृत्य प्रतिबंधक अधिनियम १९६७ चे कलम १३, १८, २०, ३८, ३९ तसेच भा.द.वि. १२० (ब) अन्वये दाखल अप क्रमांक ३०१७/१३ गुन्हयातील आरोपी प्रा. साईबाबा व इतर ५ जणांना गडचिरोली सत्र न्यायालयाने मार्च २०१७ मध्ये दोषी ठरवून जन्मठेपची शिक्षा सुनावली होती. सदर खटल्यामध्ये शिक्षा सुनावताना तत्कालीन जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. सुर्यकांत शिंदे यांनी इलेक्ट्रानिक पुराव्याच्या आधारे खटल्याचे सुक्ष्म विश्लेषण करुन शिक्षा सुनावली होती. यातील आरोपी नामे प्रशांत राही व महेश तिर्की यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात जामीनासाठी अर्ज केले होते. सदर अर्जाची सुनावणी आज नागपूर खंडपीठातील न्यायाधीश श्री. रवी के. देशपांडे आणि श्री. मुरलीधर जी. गिरटकर यांच्या समोर झाली. यावेळी त्यांनी सदर आरोपींचे जामीन अर्ज फेटाळून लावले.

आरोपींच्या वतीने सुप्रीम कोर्टाचे वकील श्रीमती नित्या रामकृष्णन यांनी युक्तीवाद करताना म्हटले की केवळ माओवादी विचारांची पुस्तके बाळगणे हा गुन्हा होत नसून यासाठी आरोपींना कारागृहात ठेवणे संयुक्तीक होणार नाही. यावर सरकारी वकील श्री. पी. के. सत्यनाथन व श्री. शार्दुल सिंग यांनी सदर युक्तीवाद फेटाळुन लावत आरोपी प्रशांत राही हे सी. पी. आय. (एम.) व रिव्होल्युशनरी डेमोक्रॅटिक फ्रंट या नक्षली कृत्यात सहभागी असणाऱ्या संघटनांच्या बैठकांमध्ये सहभागी असल्याचे विविध व्हिडीओ व प्रा. साईबाबा याच्यासोबत नियमीत गडचिरोली

जिल्हयात माओवादयांकडून होणाऱ्या हिंसक कृत्यात सहभागी असल्याचे सिडीआरच्या माध्यमातून सिध्द झाले आहे. तर महेश तिर्की याच्या ताब्यातून पोलीसांनी नक्षली चळवळीचे संबंधित आक्षेपार्ह कागदपत्रे जप्त केली असल्याचे त्याचबरोबर विविध नक्षली म्होरक्यांशी त्याचा नियमीत असलेला संपर्क व कृत्यामधील सहभाग न्यायपीठासनाच्या निर्दशनास आणून दिला. यावरुन मा. न्यायाधीशांनी दोघांचे जामीन अर्ज फेटाळून लावत दोन्ही आरोपी बंदी असलेल्या संघटनेचे सदस्य असल्याबाबत तसेच नक्षली कृत्यामध्ये मोठया प्रमाणावर सहभागी असल्याबाबतचे पुरावे ग्राहय धरुन याप्रकरणात सकृतदर्शनी तथ्य असल्याचे मान्य केले.

सदर गुन्हयाचा तपास तत्कालीन मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. सुवास बावचे साो. यांनी केला असून नागपूर खंडपीठात पैरवी अधिकारी म्हणून पोउपनि. श्री. नितीन शिंदे यांनी काम पाहिले.